# परमेश्वराविषयी निश्चिंत असणे

आणि येथे 1 राजे 17: 1–6 मध्ये असे लिहीले आहे:

*एलिया तिश्बी, हा गिलाद येथे...उपरी म्हणून राहणाऱ्यांपैकी एक होता, तो आहाबास म्हणाला, इस्त्राएलाचा देव परमेश्वर, ज्याच्या हुजुरास मी असतो, त्याच्या जीवीताची मी शपथ वाहून सांगतो की, जी तीन वर्षे आता येणार त्यांत दहीवर अथवा पर्जन्य पडणार नाही; हे सर्व माझ्या सांगण्याप्रमाणे होईल.*

*परमेश्वराचे वचन त्यास प्राप्त झाले की,*

*येथून निघून पूर्व दिशेस जा, व यार्देनेसमोरच्या करींथ—करींथ* (मला सांगायचे होते) *ओहोळानजीक लपून राहा.*

*त्या ओहोळाचे पाणी तुला प्यावयास* मिळेल; *आणि मी कावळ्यांस आज्ञा केली आहे. ते तुला अन्न पुरवितील...*

*परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणे करुन तो यार्देनेसमोरच्या करीथ ओहोळानजीक जाऊन राहीला.*

*कावळे त्यास भाकरी व मांस सकाळ संध्याकाळ आणून देत; व त्या ओहोळाचे पाणी तो पिई.*

*काही दिवसांनी ओहळ आटून गेला, कारण त्या देशांत पर्जन्यवृष्टी झाली नाही.*

*तेव्हा त्यास परमेश्वराचे वचन प्राप्त झाले की.*

*चल, सीदोनांतील सारफथ नगरात जाऊन राहा. पाहा, तुझे पोषण करण्याची, तेथल्या एका विधवेस मी आज्ञा केली आहे.*

*त्याप्रमाणे तो सारफथ येथे गेला नगराच्या वेशीजवळ तो आला.तेव्हा एक विधवा स्त्रीला काटक्या गोळा करिताना त्याने पाहीले; तिला हाक मारुन तो म्हणाला, मला, एका पात्रात, प्यावयास थोडे पाणी घेऊ नये.*

*ती पाणी आणावयास जात असता, त्याने तिला आणखी हाक मारुन सांगितले, आपल्या हाती एक भाकरीचा तुकडा मला घेऊन ये.*

*ती म्हणाली, तुमचा देव परमेश्वर याच्या जीवीताची शपथ, माझ्या जवळ भाकर मुळीच नाही; मडक्यात मुठभर पीठ, आणि कुपीत थोडेसे तेल एवढे मात्र आहे: मी दोन काटक्या जमा करीत आहे; मग मी घरी जाऊन मजसाठी व आपल्या मुलासाठी ते तयार करीन, ते आम्ही खाऊ, आणि मग मरु.*

*एलिया तिला म्हणाला, भिऊ नको; तू जा आणि म्हणतेस त्याप्रमाणे कर: पण त्यापूर्वी माझ्यासाठी एक लहानशी भाकर भाजून आण, नंतर आपल्यासाठी, व...आपल्या मुलासाठी भाज.*

*इस्त्राएलाचा देव परमेश्वर म्हणतो, परमेश्वर पृथ्वीवर पर्जन्यवृष्टी करील त्या दिवसापर्यंत, तुझे पीठाचे मडके रिकामे होणार नाही, आणि तेलाची कुपी आटणार नाही.*

*तिने* आत *जाऊन एलियाच्या सांगण्याप्रमाणे केले; तो, ती, व तिचे कुटूंब यांचा त्यावर पुष्कळ दिवस निर्वाह झाला.*

*परमेश्वर एलियाच्याद्वारे जे वचन बोलला त्याप्रमाणे तिचे ते पीठांचे मडके रिकामे झाले नाही, आणि तेलाची कुपीही आटली नाही.*

आजच्या सकाळचे संभाषण, परदेशात जाण्यापूर्वी: *देवाविषयी निश्चित असणे* या शिर्षकाची मी निवडकेली आहे.

2 आणि आता, प्रभू, तुझे वचन आशीर्वादीत कर जसे ते पुढे जात आहे, व पवित्र आत्म्याद्वारे आमची मने व विचार ताब्यात घे, आणि त्याच्या भेटीसाठी आम्हाला तयार कर, आम्ही त्याला आमच्यामध्ये बोलावितो. कारण आम्ही प्रभूच्या घरी पाहण्यात यावे, किंवा कोणाला पाहावे यासाठी येत नाहीत, परंतु तुझ्यापासून शिकण्यासाठी येतो, आणि तुझा स्वभाव, आणि तुझे मार्ग व तुझी उद्दिष्ट जाणण्यास येतो, यासाठी की आम्ही या जीवनांतील समस्येला खात्रीपूर्ण रितीने तोंड देऊ शकू व देवाविषयी खात्रीपूर्ण राहू. हे प्रभू, हे घडू दे, हे येशूच्या नावाने आम्ही मागतो. आमेन.

3 ती सकाळ फार भयंकर अशी भासत होती. फार गर्मी, व धुळीने भरलेले लोक, रस्त्यावर भुकेने व्याकुळ, आणि पृथ्वी जणू फार उष्ण व जळण्यासाठी तयार होती. हे सर्व पापांचे परिणाम व नैतिकतेची घसरण आहे.

4 तुम्ही पाहा, आहाब त्यावेळी इस्त्राएलावर—इस्त्राएलामध्ये राज्य करीत होता, तो इस्त्राएलाच्या सर्व राजांहून दुष्ट राजा होता. आहाबाएवढा दुष्ट राजा कोणी होऊन गेला नाही, कारण त्याला शिकविण्यात आले व त्याला चांगले ओळखण्यात आले. त्याने जे केले त्या सर्वात देवाला असंतुष्ट करण्यासाठी तो अपयशी झाला नाही. तरीसुध्दा त्याच्याकडे मोठ्या सैन्यांची प्रणाली होती, आणि लोक त्याच्या राजवटीत फार समृध्द झाले, परंतु तरी, तुम्ही देवाला असंतुष्ट करुन फार काळ हे चालत राहण्याची अपेक्षा करु शकत नाही.

5 आणि नंतर, त्याच्या विवाहासाठी, स्वजनांपैकी न होता, तो पुढे जाऊन एका पापी व्यक्तिबरोबर विवाहबध्द झाला, जी मुर्तीपुजक, मुर्तीची भक्ती करणारी त्याने ईजबेलबरोबर लग्न केले.आणि ती काही विश्वासी नव्हती.

6 आणि कोणीही विश्वासणाऱ्यांने अविश्वासणाऱ्यांबरोबर, कोणत्याही परिस्थितीत लग्न करु नये. सदैव विश्वासणाऱ्यांशीच विवाहबध्द व्हावे.

7 परंतु आहाबाने हे वाईट ते केले होते. यात काही संशय नाही की ईजबेल ही एक सुंदर स्त्री होती. व तो तिच्या सौंदर्यासाठी भुलला होता, ती वास्तविक कोण होती ते त्याने पाहिले नाही. हेच, पुष्कळ लोक आजपर्यंत अशाच चुका करत आले आहेत.

8 आणि तिने मुर्तिपूजा त्या देशात आणली, लोकांमध्ये. आणि लोक याजक, सेवकजन, सर्व मुर्तीपुजेचे भक्ष्य बनले या मोठ्या प्रसिध्द मागणीला बळी पडले.

9 आणि आज हेच चित्र आमच्या देशाचेही आहे. आम्ही अशाप्रकारे ह्या प्रसिध्द मागणीसाठी बळी पडतो. ह्यांत काही शंका नाही. याजकांना वाटले असणार ठीक आहे, जीतपर्यंत सरकारही त्याला योग्य ठरवीत होती. परंतु मी त्याची चिंता करीत नाही की सरकार कशाला योग्य ठरविते, ज्याला देव योग्य ठरवितो तोच योग्य आहे. आणि लोकांनी विचार केला की ठीक आहे. जगातल्या काही गोष्टीमध्ये पूर्व अनुमान करण्यास काही हरकत नाही.

10 आणि कोणी मला विचारिल की जे तुम्ही आता बोललात, आज हेच चित्र आहे ते आम्ही तपासून पाहावे. आम्ही हा विचारही करीत नाही की आम्ही मुर्तीपुजक आहोत, परंतु वास्तविक मुर्तीपुजक आहोत आणि सरकारचा त्याला पाठींबाही आहे. लोक आज मुर्तीपुजक आहेत, कारण ते—ते मुर्तीपुजा करतात. त्यांतले काहीजण सिनेमासितारे, ह्यांना पुजतात. काहीजण पैशांची पुजा करतात; त्याला पुज्य मानतात. आणि काही दुरदर्शनच्या कलाकारांना पुजतात, पुज्य समजतात. परंतु देवापेक्षा ज्याला अधिक स्थान दिले जाते ती मुर्ती होते, ते काहीही का असेना.

11 सैतानालासुध्दा, जो आमचा मोठा शत्रु आहे, तो फार धुर्त आहे, तो असेही करितो की, मंडळीलासुध्दा देवाची मुर्ती बनवून सादर करीत असतो. कदाचित तुमच्याकडे मोठी मंडळी असेल. त्याची इमारत फार मोठी असेल, किंवा फार मोठा संप्रदाय असेल. आणि, पुन्हा, फार मोठी मंडळीची संख्या, परंतु आमच्या हृदयात, ह्यांतील काहीच देवापेक्षा पहिले येत नाही. देवापेक्षा जे काही पहिले स्थान घेते, ती मुर्ती बनते.

12 आणि दुसऱ्या राजांच्या राजवटीमध्ये, अशी आध्यात्मिकता होती तशी नाहीए असे हे लोक जाणतात. आणि त्यांनी विचार केला, ते एक धार्मिक राष्ट्र असल्यामुळे, सगळं काही योग्य होईल. आणि अशाचप्रकारे आम्हीही त्याच स्थितीत पोहचलो आहोत.

13 काही महिन्यांपूर्वी मी माझ्या एका प्रिय मित्राबरोबर बोलत होतो. त्याने म्हटले, “भाऊ ब्रॅन्हम आपण संयुक्त राज्य अमेरिकेला त्यांच्या त्रुटीबद्दल नेहमी सांगत असता.” तो म्हणाला, “तुम्ही नेहमी त्यांच्या पापांचे वर्णन करुन सांगता की, कसे परमेश्वर या देशाला शिक्षा देणार आहे.”

14 मी सांगितले, “देवाला न्यायी बनून राहण्यासाठी, ते केलेच पाहीजे.”

ते म्हणाले, “परंतु, भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही हे विसरता की या देशाची स्थापना वचनांवरच आधारित आहे. आणि आमचे वाडवडिल या ठिकाणी आले होते, आणि परमेश्वराने हा देश आम्हास वतन दिला आहे. आणि आम्ही एक धार्मिक राष्ट्र आहोत.”

15 मी सांगितले, “हे सर्व खरे आहे. आणि कोणाला काय माहीत आहे की मी कशाप्रकारे या देशाचे कौतुक करतो! परंतु, माझ्या भावांनो, पाहा, की इस्त्राएलही देवाचा निवडलेला देश होता, आणि देवाने आपले संदेष्टे व आपले थोर व्यक्ती पाठविले. परंतु परमेश्वर पाप सहन करु शकत नाही. आणि त्यांनी असे केले की इस्त्राएलाने जे पेरले होते, ते त्यांना कापावे लागले. मग जर त्याने इस्त्राएलाशी असे केले की पेरलेले त्यांना कापावे लागले, तर तो आम्हालाही कापण्यास लावील जे आम्ही पेरित आहोत. तो मनुष्यांची कदर करीत नाही.”

16 आणि आम्ही अशा गोष्टी विचारात घेतो. कारण आम्ही आमच्या वाडवडिलांच्या कर्मावर निर्भर राहत आलोय, व आमच्या सांप्रदायिक मंडळ्यांचे पाया रचणारे, ज्यांचे फार मोठे बलिदान देवासाठी होते, हे सर्व योग्य आहे व कौतुकास्पद आहे. परंतु त्याद्वारे आम्हाला तारण मिळू शकत नाही! तारण हे व्यक्तीश: आहे. देव व प्रत्येक मनुष्य यांच्या मध्ये हे प्रकरण आहे. परमेश्वराच्या समोर आम्हाला स्वत:ला उत्तर द्यावे लागेल व हे उत्तर आमच्या मंडळी व देशाच्या आधारावर द्यावे लागणार नाही.

17 या प्रकारच्या गोष्टी आज आमच्या देशात पसरल्या आहेत, ज्यामध्ये सर्वात आत्मिक समजले जाणारे लोक आहेत, तुम्ही आध्यात्मिक स्त्री व पुरुषांकडे गेलात यांच्या हृदयात काहीतरी कमतरता दिसून येते.

18 गेल्या काही आठवड्यामध्ये, मी अशाप्रकारच्या परिस्थितीतून गुदरलो आहे व मला असाही अनुभव आला आहे. मी ज्या मनुष्यांबद्दल विचार केला होता की ते फार आत्मिकजण आहेत, परंतु मला ते असे आढळले की ते जगाच्या गोष्टींविषयी जास्त जोर देत आहेत, मी त्यांना हे सांगताना ऐकले, “देवाने मला फार *मोठ्या–मोठ्या* गोष्टी दिल्या आहेत…” अशा प्रकारच्या गोष्टी ते बोलतात. हे सांगुन ते खोटा आभास निर्माण करुन फसवतात.

19 जगाच्या भौतिक गोष्टी ज्या दिसण्यात मोठ्या वाटतात त्या नेहमी देवाच्या इच्छेवर निर्भर नसतात. देव पापी व न्यायी दोहोंवर समान पाऊस पाडतो. परंतु आज जगाला त्याची गरज आहे की विश्वासासंबंधी फसवणूक नसावी, म्हणजे स्वतःला कोणत्या भ्रमात ठेऊन आध्यात्मिक समजून फसवणूक करुन घेऊ नये.

20 काही वेळेला विश्वास फार मोठी अद्भूत कामे करतो, परंतु ती कार्ये आत्मिक हृदयांतून आलेली नसतात. काय आमच्या प्रभूने हे सांगितले नाही काय? “त्यादिवशी पुष्कळजण माझ्याकडे येतील, व म्हणतील, ‘तुझ्या नावाने मी *हे* केले, *ते* केले नाही काय?’ तेव्हा मी त्यांना सांगेन की, ‘अहो अनाचार करणाऱ्यांनो माझ्यापासून निघून जा.’” अनाचार काय आहे? घोर अन्याय हाच आहे की, जे योग्य ते समजते परंतु ते करीत नाहीत. “मला तुमची कधीच ओळख नव्हती, ” असे तो म्हणेल आज आम्ही त्याच दिवसांत राहत आहोत.

21 आज आम्हाला फार भौतिक वस्तुची गरज नाहीए आम्हाकडे त्या आहेत. आम्हाला मोठेमोठे चर्च नकोयेत. आम्हाला मोठी सभाही नकोय. आम्हाला दुरदर्शन व रेडियोवर असण्याची गरज नाहीए. आम्हाला या सर्वांची फार गरज नाहीए. परंतु आज आम्हाला गरज आहे आत्मिक व्यक्ति बनण्याची जो आपल्याला देवासमोर नम्र करील, जरी त्याच्याकडे काही पैसे नसतील, परंतु प्रार्थना करुन जोपर्यंत त्यांचा आत्मा देवाच्या गुणांनी भरुन समाधान पावत नाही, आणि त्यांच्या हृदयात असे संजीवन येईल ज्याद्वारे त्यांच्या वृत्तीमध्ये व वातावरणात बदल घडून येईल, जेथे ते जगतात.

22 जरी पायांत बुटाची एक जोडीही नसेल तरी चालेल, जरी तुम्ही चिंध्या पांघरल्या असतील, परंतु तुमच्या हृदयात मंजुळ सुमधुर गीत देवासाठी गायले जात असेल. मी तर या परिस्थितीला जगाच्या सर्व पैशांपेक्षा जास्त पसंत करीन.

23 म्हणून तुम्ही हे नाही सांगू शकत की भौतिक गोष्टींची प्राप्तीही देवाच्या आशीर्वादाचे चिन्ह आहे. दाविदाने प्रभूला सांगितले होते की, दुष्टाला फार…फोफाटात वाढताना पाहीले. “परंतु देवाने त्याला विचारले होते की, त्यांचा अंत ध्यानात आणला आहे का?” या गोष्टींशी त्याचे नाते नाही की आम्ही किती चांगले कपडे नेसतो किंवा किती चांगले खातो, हे सर्व देवाच्या उपस्थितीत जाणार नाही. हे शरीर ज्यामध्ये आम्ही राहतो ते नष्ट होईल, त्याची कितीही काळजी का घेतली जाईना? परंतु मनुष्याचा प्राण जो मनुष्याच्या आत असतो, ती आत्मिक अवस्था जी पोहचते.

24 परंतु काही गोष्टी आम्ही गृहीत धरुन चालतो. आम्ही विचार करतो की, आम्ही एक मोठे राष्ट्र आहो… अशाप्रकारे आहाब व साऱ्या इस्त्राएली लोकांनी त्यावेळी त्याचा फायदा उठवला, ज्या त्यांना योग्य वाटत होत्या. त्यांचे धर्मगुरु व प्रचारकांनी हे सांगण्याचा प्रयत्न केला, “सर्वकाही ठीक आहे, सर्व अगदी चांगले आहे.” परंतु त्यांच्यात एक असा होता, त्याने चुकीच्या गोष्टीच्या विरुध्द आवाज उठविला कारण त्याला माहीत होते की पवित्र परमेश्वर ह्या अपवित्र, आधुनिक धर्माने संतुष्ट होऊ शकत नाही.

25 तो स्वर्गीय परमेश्वर आजही तसाच आहे. आमच्या सर्व श्रमात व मोठ्या गोष्टींत जे आम्ही करण्याचा प्रयत्न करीत आहोत, देव कधीच प्रसन्न होणार नाही. त्याच्यापुढे पूर्णपणे पवित्र केलेल्या जीवनाव्यतिरिक्त.

26 आम्ही मोठमोठ्या शाळा, प्रार्थनागृह हे बनवू शकतो, मोठ्यामोठ्या संस्था स्थापन करु शकतो, आणि मोठ्यामोठ्या गोष्टी बनवू शकतो, परंतु देव त्याद्वारे समाधान पावत नाही जोपर्यंत मनुष्याचा प्राण देवाच्या वेदीवर पूर्ण रुपाने देवाच्या कामासाठी प्रतिष्ठापित पवित्र केला जात नाही. आणि आज आपण असे होत असताना काहीच पाहत नाही.

27 आम्ही पाहतो की आमच्या प्रार्थना सभा किती कमजोर आहेत, फक्त काही मिनिटाची प्रार्थना करुन, लगेच बिछान्यावर पडतो. आम्ही हे दिवसांतून एक किंवा दोन वेळा अनुभवत असतो. त्यासाठी आम्ही सर्व अपराधी आहोत. आमच्या देशात, नैतिकतेचे पतन होत आहे. आमच्या येथे सर्वत्र बिली ग्रॅहम व ओरल रॉबर्ट्स आहेत. परंतु जोपर्यंत अमेरिकेच्या हृदयात जिवंत देवाची तहान येत नाही व आम्हाला जिवंत अनुभव जर होणार नाही तर जिवंत देवावरील आमचा अनुभव जीवनी ठरणार नाही, जिवंत देवावरील न मावळणारा विश्वास, अन्यथा आम्ही फक्त आमचे बुध्दी खाजवत राहू, जसे सांगितले आहे.

28 आम्ही अशी अपेक्षा करतो की आम्ही आमची छाती पुढे काढून व कॉलर उभी करुन रस्त्यावरचे लोक आम्हाला “धर्मपंडीत” व “दैवी ज्ञानाचा पंडीत” असे संबोधतील. आम्ही भलेही जगाच्या सर्वात मोठ्या मंडळीचे पाळक बनले जाऊ आणि जरी असे पवित्र व्यक्ति बनू की कोणी आमच्यावर एक बोट देखिल उगारणार नाही. परंतु जोपर्यंत आमच्या आतील आत्मा, परमेश्वराकरिता उत्तेजनासाठी जर भरत नाही व आत देवासाठी तळमळ निर्माण करीत नाही, तर सर्वकाही थोतांड आहे. “जशी हरिणी पाण्याच्या प्रवाहासाठी लुलपते तसा माझा जीव, हे देवा तुझ्यासाठी तान्हेला आहे.” जोपर्यंत आम्हाला हे अनुभव जीवनात नसतील, तर सगळं काही व्यर्थ आहे.

29 म्हणूनच, साम्यवाद हा मूळ पकडत पुढे चालला आहे आणि सर्व नामधारी संप्रदाय एकत्रित येऊनही त्याला थांबवू शकणार नाही. कारण त्यासंबंधी भविष्यवाणी केली गेली आहे. परंतु देव आपल्या मंडळीला बोलावत आहे.

30 कसे एका स्त्रीकडे एलियासारखी समजण्याची कुवत व मानसिक स्तर होता! कारण, तुमची कृतीच दाखवून देते की तुम्ही कोण आहात. आणि पुन्हा तिला देवाच्या संदेष्ट्याची काळजी घेण्यासाठी नेमले होते. स्मरण ठेवा. ती एक परराष्ट्रीय होती, यहूदी नव्हती.

31 आणि धरती तापली होती. यात काही संशय नाही की त्या स्त्रीमध्ये कुवत होती, ती विश्वसनीय होती... कारण आम्ही पाहतो की देवासमोर जर ती योग्य नसती, तर आपल्या संदेष्ट्याची काळजी घेण्यासाठी तिची कधी निवड केलीच नसती. परमेश्वराने आपल्या संदेष्ट्याला तिच्या घरी कधीच पाठविले नसते जर ती अपात्र असती तर.

32 ही निवड त्या स्त्रीची स्वतःची नव्हती, तर देवाची होती. हे तिच्या इच्छेनुसार नव्हते तर देवाच्या मर्जीप्रमाणे होते. एलिया तर त्या झऱ्याजवळ राहत होता व कावळे त्याला भाकर आणून देत असत, परंतु ही परमेश्वराची आज्ञा होती, काहीतरी घडून आणण्यासाठी. परमेश्वराने एक अशा विश्वासी व्यक्तीला निवडले होते, ज्यांचा स्वभाव एलियाबरोबर जुळला जाईल.

33 ती विधवा स्त्री होती. आणि आम्हाला असे दिसते की एक विधवा स्त्री जिचा पती नाहीए व एका पुत्राला मोठे करण्यासाठी किती कष्ट करावे लागले असतील?

34 आणि त्या देशात, ते लोक आपल्या शेतीवर अवलंबून होते, त्याच्याकडे आमच्यासारखे आजच्याप्रमाणे प्रकल्पाच्या योजना नव्हत्या आणि—आणि जीवनचक्र चालू ठेवण्यासाठी दुसरा काही मार्गही नव्हता. त्यामुळे ते पिकांवर निर्भर होते. आणि लोकांच्या अन्यायामुळे व नैतिक पतनामुळे त्या ठिकाणावर, दुष्काळ आला. येथे ते सर्वच भुकेने व्याकुळ होऊन मरणोःन्मुख होत होते.

35 आणि तेव्हा आम्हाला दिसते की यात काही संशय नाही की त्या विधवा स्त्रीने आपल्याकडील पिठ कमी–कमी होत चाललेले पाहिले व त्यासाठी तिने अनेक रात्री प्रार्थना केल्या होत्या व त्यावेळी अशी अवस्था आली होती की त्या पात्रात मुठभरच पीठ शिल्लक राहीले होते. तिच्याकडे फक्त मुठभर पीठ होते. मृत्यु तिच्या घराच्या दरवाज्याजवळ येऊन ठेपला होता. कारण कुठूनही भोजन मिळणे शक्य नव्हते. कारण पूर्ण देश उपासमारीने मरत होता.

36 आणि तिच्या कुपीमध्ये, फक्त एक चमचभर तेल शिल्लक होते. तिच्यात व मृत्युमध्ये फक्त ते थोडे तेल व पिठ शिल्लक राहिले होते. ती या परिस्थितीत आपल्या प्रार्थनेत अधिक प्रामाणिक होत गेली. ही गोष्ट जर आज आम्ही आपल्या स्वतःस लावून घेतली तर आम्ही आमच्या प्रार्थनेत अधिक प्रामाणिक होवू, जेव्हा आम्ही हे ओळखू की मृत्यु आपल्या दरवाज्याजवळ आहे.

37 आणि मी विश्वास करतो की, तिने गेल्या रात्री सर्व प्रार्थना केली असणार, कारण एक अजून दिवस भरला होता. ती आपल्या 3–4 वर्षाच्या मुलाच्या पांढरे झालेल्या ओठांकडे पाहत असणार. आणि ती आपल्या स्वतःच्या हाडांना स्पष्ट पाहत होती, ज्यामुळे शरीरावरचे मांस कमी–कमी होत गेले व एका आईच्या दृष्टीसमोरच हे सर्व घडताना पाहणे, ही अत्यंत वाईट परिस्थिती होती. आणि तरीही ती परमेश्वराजवळ आपले हात जोडून रात्र व दिवस प्रार्थना करीत होती, "आता आमच्याकडे फक्त एक मूठभर पिठ व चमचभर तेलच राहिले आहे."

38 तुम्ही हे जाणता की ही अजब गोष्ट आहे. देव करो आणि आमच्या हृदयाच्या आत ते उतरु देवो की आम्ही ते आत साठवून ठेऊ. कदाचित मी पुन्हा कधी प्रचार करताना सापडलो नाही. तर हा तुमच्यासाठी एक संदेश बनो, हे फार अद्भूत. फारच अद्भूत आहे, देव काही वेळेला अशा पद्धतीने करीत असतो.

39 तुम्हाला माहित आहे की, जेव्हा आम्ही आपल्या सर्व पापांचा अंगीकार करतो व पश्चाताप करुन पाप पदरी घेतो...व त्यावर विश्वास करतो. एक परिस्थिती जी त्याच्या इच्छेनुसार येते त्यांतून आम्हाला जावे लागते आणि कधी असेही होते की आम्ही आमच्या पापांचा अंगीकार केलेला असतो व आज्ञापालनाला सुरुवात करीत असतो व आपल्या चुकांची सुधारणा करीत असतो व आमच्या समजुतीप्रमाणे आम्ही ते सर्व करीत असतो. परमेश्वराची जी प्रत्येक मागणी, ती पूर्ण झालेली असते तरीही तो कधीकधी मुका राहतो व प्रार्थनेचे काहीच उत्तर देत नाही.

40 मला खात्री आहे की आज सकाळी मी अशाच लोकांशी बोलत आहे, जे त्या परिस्थितीत आले आहेत. आणि अशा प्रकारच्या परिस्थितींतून मीही गेलो आहे. आणि जेव्हा मी माझ्या भुतकाळातील जीवन मागे वळून पाहिले व शोधले की कुठे माझे चुकले आहे? तेव्हा त्या चुकांचा शोध करुन, ते मानून मी प्रभूला सांगत असे की, "मी ह्यामध्ये सुधारणा करीन, " व जाऊन मी तसेच करीत असे. आणि पुन्हा येऊन म्हणे की, "तू जो महान परमेश्वर आहेस माझ्या प्रार्थनेचे मला उत्तर दे. मी सर्व तुझ्या मागण्या पूर्ण केल्या आहेत." ज्या मी कराव्या असे तू ठरविले. आणि प्रत्येक तुझ्या मागणीप्रमाणे मी केले आहे

आणि तरीही तो काही हालचाल करीत नाही तो शांतच राहतो, तेव्हा तुम्ही निश्चितपणे सांगावयास हवे की तो देव आहे. निराश होऊ नका अशा परिस्थितीत कारण हे केवळ ह्यासाठी आहे की आम्ही ह्या स्थितीतही हृदयात देवाबद्दल निश्चिंत असावे.

41 माझा विषय हाच आहे. की काहीही करण्याअगोदर, हृदयात याविषयी खात्रीशीर होणे की देव आहे. आणि जेव्हा आम्ही त्याच्या सांगण्याप्रमाणे, वचनांप्रमाणे त्याची मागणी पूर्ण करतो तेव्हा आम्हाला पूर्ण निश्चित असणे गरजेचे आहे की देव आहे. तेव्हा विश्वास आपले काम करण्यास सुरुवात करतो, अशा वेळेला विश्वास सबळ होतो कारण त्याला माहीत आहे की, तो आहे.

42 आणि तुम्ही त्याच्या प्रत्येक आज्ञावचनानुसार पूर्ण करता व विश्वास करता की, तो आहे तेव्हा तुमचा विश्वास स्थिर होतो. हो त्याचे नाव धन्यवादीत असो! विश्वास तेव्हा हादरु शकत नाही, कारण ही गोष्ट खरी आहे की, परमेश्वर आहे आणि त्यांना प्रतिफळ देतोच जे झटून त्याचा शोध करतात.

43 हे ब्रॅन्हम टॅबरनॅकल, ही गोष्ट तुमच्या हृदयात खोल रुतून जावो की ते कधी तुमच्यातून न निघून जावो. जर तुम्ही देवाच्या मागणीप्रमाणे सर्वकाही केले आहे आणि आपल्या हृदयात विश्वास करित आहा की तो आहे व त्यावरही तुमच्या प्रार्थनेचे उत्तर मिळत नाही. तर समजा की तो तुमच्या विश्वासाला पारखत आहे. कारण त्याला तसे करणे आवडते. तुम्ही तुमच्या पापांची कबुली देता व देवाची आज्ञा पूर्ण करता परंतु तरीही परमेश्वर मुका राहतो व उत्तर देत नाही. तेव्हाही आठवण ठेवा की तेव्हा तुमचा विश्वास स्थिर ठेवायचा आहे व म्हणायचे आहे. परमेश्वर आहे. यानंतर आपला विश्वास पूर्णरितीने स्थिर राहू लागतो, हे न समजता की उत्तर का मिळत नाहीए, किंवा काय समस्या असेल, परंतु तो आहे ह्याविषयी मी निश्चिंत आहे.

44 मग, आठवण ठेवा, जर तो आहे, तर त्याची वचने तो सत्य प्रगट करील. आणि जर अशा परिस्थितीत जर तो आम्हाला टाकतो व त्यात जर आपण खरे राहिलो. तर तो आपल्या वचनाशी बांधलेला राहतो, ते पूर्ण करण्यासाठी. अशा अवस्थेत कधीही निराश होऊन म्हणू नये की, "मी कधी बरा झालोच नाही. मी..." हो, दुर्बळ विश्वासाला असे कधी म्हणू ही देऊ नका. जर सर्व अपराधांची कबुली दिली आहे, व परमेश्वराच्या आज्ञेचे पूर्ण पालन केले आहे तर विश्वास मजबूत उभा राहील. कोणतीही गोष्ट किंवा स्थिती त्याला हालवू शकणार नाही व तुम्ही सुनिश्चित व्हाल. असे लिहीले आहे की, "जे परमेश्वराची प्रतिक्षा करतात ते नवीन शक्ती संपादन करतील, ते गरुडासारखे शक्ती संपादन करतील ते धावतील तरी थकणार नाहीत ते चालतील तरी ते थकणार नाहीत."

45 थांबा, जेव्हा तुम्ही सर्व त्याच्या आज्ञेनुसार पूर्ण केले आहे, तर प्रतिक्षा करा, आपल्या विश्वासाला स्थिर असे प्रकट करायचे आहे. जर तुम्ही देवाच्या म्हणण्यानुसार सर्व...वचने मान्य केली आहेत व त्या सर्व गोष्टींवर पूर्ण विचार केला आहे आणि जे काही परमेश्वर मागणी करीत होता ते आम्ही केले आहे. तेव्हा विश्वास तेथे, स्थिर उभा राहतो व दर्शवितो तो आहे. देवाविषयी निश्चिंत असणे आहे.

46 तुम्ही हे समजा की, तो पारख करणे पसंत करतो. तो आपल्या विश्वासाची प्रतिक्रिया पाहणे पसंत करतो. काय तुम्हाला ही गोष्ट माहीत आहे? परमेश्वराला हे आवडते की, तुम्ही कशी प्रतिक्रिया देता. जेव्हा तुम्ही सांगता, "हे प्रभू, मी तुझ्यावर विश्वास करतो तूच माझा उध्दारकर्ता आहेस. मी विश्वास करतो की तूच मला आरोग्य देणारा आहेस. मी विश्वास करतो की, तूच एक जो मला पवित्र आत्मा देतो. आणि ज्या वस्तूंची मला गरज आहे. तू जो देव तूच मला ते देतोस." आणि जेव्हा तुम्ही आपले पाप व अपराधाचा स्विकार करता

व म्हणता की परमेश्वरासाठी तुम्ही काय कराल? जर त्याने तुम्हाला बरे केले तर. आणि जेव्हा तसे काही घडत नाही तेव्हा आम्ही एका घाबरट व्यक्तिसारखे मागे पळून जातो. परमेश्वर अशा लोकांचा उपयोग करत नाही. त्याच्याकडे असा काही मार्ग राहत नाही की, तो तुमच्या प्रार्थनेला उत्तर देईल कारण तो विश्वास पाहूनच उत्तर देतो. मग अचानक, जेव्हा तुम्ही मागे वळता व तो उत्तर देत नाही. परंतु एक खरा, सत्य विश्वास ठाम उभा राहतो व खात्रीशीर असतो की देव आहे. निश्चिंत राहा कारण तो आहे.

47 आणि जर परमेश्वर तुमच्या पापांच्या कबुलीनुसार काही करण्यासाठी सांगत असेल, आणि तुम्ही तसे करता तेव्हा तुमचा विश्वास असा दर्शवितो की, देव आहे व जे काही प्रार्थनेत म्हटले आहे तसेच घडणार. तुमची मागणी तेव्हा पूर्ण होणे गरजेचे होते. हो मी—मी अशी आशा करीत आहे की, ह्या सत्याला समजण्यासाठी तुम्ही चुकणार नाही. जर तुम्ही देवाविषयी निश्चिंत राहता तर देव आपल्या वचनांबाबत खात्रीशीर राहतो, तो फक्त तुमची पारख करण्यासाठी थांबतो.

त्याने हे काही ठिकाणी अगोदर केलेले आहे. आपण त्यांतील एक दोन घटनांचा अभ्यास करुया.

48 या आपण आता हिब्रु मुलांविषयी विचारकरु. त्यांना कोणत्या मुर्तीला नमन करायचे नव्हते. परमेश्वराला त्यांच्यावर पूर्ण भरवसा होता. आणि जेव्हा त्यांनी हे ऐकले की, त्या तप्त भट्टीतून त्यांना जावे लागेल, ते म्हणाले, “आमचा देव समर्थ आहे ह्या तप्त भट्टीतून सोडवावयाला. परंतु जरी त्याने नाही सोडवले तरी आम्ही तुझ्या कोणत्याही मुर्तीला नमन करणार नाहीत.” पाहा ते निश्चिंत होते. देवाविषयी खात्रीशीर होते.

49 त्यांना हे माहीत होते की तो यहोवा आहे, त्यांना माहीत होते की, तो प्रार्थनेचे उत्तर देतो. परंतु तो त्यांच्याविषयी ऐकेल, की न ऐकेल तरी ते त्यांच्या चांगल्यासाठी करणार, त्यांनी त्यांच्या गोष्टी बोलल्याव परमेश्वराच्यासमोर पापांची कबुली देऊन मृत्युमध्ये ते चालत गेले.

50 जेव्हा ते त्या जळत्या भट्टीकडे जात होते, तेव्हा ते या गोष्टींविषयी निश्चिंत होते, की, जरी परमेश्वर त्यांना त्यात भस्मही होऊ देईल, तरी तो त्यांना पुनरुत्थानाच्या दिवशी, पुन्हा उठवील. ते परमेश्वराच्या बाबतीत पूर्ण निश्चिंत होते, कारण त्यांना हे माहीत होते की, परमेश्वर जे काही कार्य करील ते त्यांच्या हिताचे असेल. आणि देवाविषयी निश्चिंत होतो, तेव्हा तो सर्व कार्ये आमच्या हिताचेच करतो.

51 म्हणून, त्यांनी आपले म्हणणे निश्चयपूर्वक सांगितले. कारण ते देवाविषयी निश्चिंत होते, आणि ते सरळ त्या भट्टीमध्ये चालत गेले. आणि परमेश्वराने त्यांना त्यामध्ये जाऊ दिले. व चुपचाप थांबून, त्यांकडे बघू लागला. व तो त्यांची प्रतिक्रिया पाहू इच्छित होता.

52 जेव्हा, राजाने त्यांना सांगितले, “जेव्हा शिंग वाजले तेव्हा तुम्ही नमन केले काय?”

ते म्हणाले, “नाही. आम्ही त्याला नमन केले नाही.” येथे तुमचा विश्वास आहे, जो अशा वेळेमध्येही स्थिर राहतो.

“असे, मग तुम्ही नमन केले नाही? तुम्हाला माहीत आहे ना माझा हुकुम?”

“होय, आम्हाला तुझे फर्मान माहीत आहे.”

“माझी आज्ञा अशी आहे की, भट्टी नेहमीपेक्षा सातपट तप्त करा व तुम्हाला त्यामध्ये मी फेकून देईन. आता तुम्ही नमन करता काय?”

“नाही. आम्ही दंडवत घालणार नाही.” हा होता त्यांचा विश्वास.

53 देव म्हणतो, “ठीक, मी पाहीन की ते त्याबद्दल काय करतात. मी पाहीन त्यांची विश्वासाबद्दल काय प्रतिक्रीया आहे?”

54 तेव्हा राजाने हुकुम दिला, “ह्यांचे हातपाय बांधा, व त्यांना भट्टीजवळ घेऊन चला.” व त्यांना भट्टीपर्यंत घेऊन गेले त्यांच्यासमोर अग्नीची भट्टी तप्त करण्यात आली होती. देव चुपचाप उभे राहून, अजूनही पाहत होता. परंतु ते एकदम निश्चिंत होते, परमेश्वर आहे. त्यांनी आपले अपराध अगोदरच कबूल केले होते. ते जे काही जाणत होते त्यांप्रमाणे त्यांनी सर्वकाही देवापुढे ठिक केले. ते देवाविषयी निश्चिंत होते.

55 म्हणून ते त्या अग्नीच्या भट्टीमध्ये चालत गेले. आणि तेव्हा शेवटच्या क्षणी परमेश्वर स्वर्गातून वायूच्या रथांवर स्वार होऊन त्यांकडे उतरुन आला, आणि त्यांना त्या वायुद्वारे पंख्यासारखी हवा दिली, व त्यांचे सांत्वन करुन धीर दिला.

56 परमेश्वर तुमच्या विश्वासाला त्या स्थितीपर्यंत जाऊ देतो जेथे त्याबद्दल प्रतिक्रिया होऊ शकेल.

57 जुन्या करारात, इयोब होऊन गेला, ज्याच्यावर दोषारोप करणाऱ्या सैतानाने असे दोष लावले होते की त्याने काही गुप्त पातके केली आहेत. परंतु ईयोब हे जाणून होता की त्याने कोणतेही पाप केले नाही. तो हे जाणत होता की जे काही त्याने केले होते त्याची कबुली देवाकडे त्याने दिली होती, व क्षमा मागून त्याने वेदीवर होमबली अर्पण केले होते. हीच देवाची मागणी होती. हेच देव मागत होता, की त्याने कबुली द्यावी व होमार्पण करावे. आणि इयोबाने ते सर्व केले होते.

58 आणि सैतानाने म्हटले की, “हा धनवान व्यक्ति आहे. मी त्याचे उंट व मेंढरे घेतो.” आणि सरतेशेवटी त्याने येथपर्यंत केले की त्याच्या हृदयाच्या तुकड्यांचे, म्हणजे त्याचे लेकरेसुध्दा त्याने हिरावून नेली.

59 परंतु इयोब हे झाल्यावरही, परमेश्वराबाबतीत विश्वसनीय बनून राहीला. तो हे जाणत होता, की परमेश्वर आहे कारण तो त्याच्याशी बोलला होता, व त्याच्या आवश्यकता त्याने पूर्ण केल्या होत्या. त्याने पुन्हा एकदा शोधून पारख केली व त्याला हे समजले की, “मी होमबली दिले आहेत. मी आपल्या हृदयात म्हटले कदाचित माझ्या मुलांनी व मुलींनी उत्सव केला होता, तेव्हा त्यांच्या हृदयात गुप्तपणे काही पापे केली असतील, म्हणून मी होमबली देईन यासाठी की त्यांनी हृदयात काही पापी विचार केला असेल, तर त्यांच्यासाठी अशाप्रकारे मी प्रायश्चित करीन व त्यांसाठी कबुली दईन.”

60 हे परमेश्वरा! देव जे म्हणतो ते जेव्हा मनुष्य करतो, तेव्हा त्याला खात्री असते की, तो आहे व त्याला त्याबद्दल उत्तर द्यायचे आहे. प्रत्येक वेळेला, विश्वास देवाला दृश्यांत खेचून आणतो.

61 जेव्हा तुम्ही जे योग्य ते करता, व देवाच्या आवश्यकतेनुसार कार्य करुन होते, जेव्हा आपल्या पापांचे प्रायश्चित्त करुन होते व सर्वकाही सरळ करता, व चुकांची दुरुस्ती करुन देवापुढे तेठेवता. तेव्हा आम्हाला चिंता करण्याची गरज नाही की, परमेश्वर असा चूप का आहे, तो तरीही देवच आहे, तो वाट पाहतो की, आमचा विश्वास दृढ व्हावा. तुम्ही तुमचे काम पूर्ण केले आहे, आता, तो आपल्या विश्वासाची कृती पाहू इच्छितो की, या परिस्थितीत तुम्ही काय कराल किंवा तुमची त्यासाठी काय प्रतिक्रिया आहे.

62 जर तुमच्यासाठी अभिषेक करुन प्रार्थना केली गेली असेल, तर देव वाट पाहत बघतो, की तुम्ही त्याबद्दल काय विश्वास दाखविता. असे तर नाही होणार ना की, रविवारी एका ठिकाणी, दुसऱ्या दिवशी दुसऱ्या ठिकाणी, व दुसरा आरोग्य देणारा त्या शहरात आला

तेथे धावता. तो तुमच्या विश्वासाची प्रतिक्रिया पाहत बसतो. असे तर नाही होत ना, की दुसऱ्या दिवशी म्हणता, “मला अजून बरे वाटत नाही, मला वाटते अजून मी बरा झालेलो नाही.” याचा अर्थ असा होतो की, प्रथम प्रार्थनेच्या रांगेत येण्यास तू अजूनही योग्य नाही. कारण त्या रांगेत येण्यास अजून मी लायक नाही, तयार नाही. त्याचा अर्थ असा आहे की, तुम्हाला विश्वासच नाही की तो देव आहे. मी नाही...

63 तुम्ही म्हणू शकता, की “ब्रदर, मी तुमच्याशी असहमत आहे.” परंतु तुमची स्वतःची कृती दर्शविते की, तुम्ही कोण आहात. “तुम्ही त्याच्या फळांवरुन त्यांना ओळखाल, ” असे लिहिलेले आहे. जर एक मनुष्य स्वतःला ख्रिस्ती संबोधतो, व अजून दारु पितो व धुम्रपान करतो व जुगार खेळतो, व अश्लिल विनोद करतो, व म्हणतो, “बायबलचा अर्धा भाग सत्य, व अर्धा भाग असत्य आहे, ” कदाचित तो शुभवर्तमानाचा प्रचारक का असेना, तो बायबलचा अर्धा भाग नाकारतो, तर तो अजूनही पापी आहे. तो अजूनही योग्य झालेला नाहीए.

64 परंतु जेव्हा आम्ही खुलेपणाने ही कबुली देतो की, देव हा आजही तोच परमेश्वर आहे, परंतु आमचे जीवन त्याच्या हाती पूर्णपणे असते व जेव्हा म्हणतो की, “प्रभू, मी माती आहे; तू कुंभार आहेस, ” तेव्हा जे पाहिजे ते मागू शकतो. तेव्हा विश्वास डळमळीत होत नाही, तर तो स्थिर व दृढ बनून राहतो.

65 जरी परिस्थितीची हालचाल उजवी व डावीकडे पडताना पाहू, परंतु तो विश्वास कधी हालणारही नाही, कारण तेव्हा आम्ही निश्चिंत होतो की देव आहे. आणि जर तो आहे, तर तो त्याचे अभिवचन पाळतो. तो असे करु शकत नाही की, तो अभिवचन देऊन ते पूर्ण करणार नाही. तो देव आहे, त्याला आपले वचन पाळावे लागते. हो, मला ते आवडते. कारण तो आपल्या वचनांशी बांधलेला राहतो.

66 ईयोबाने यज्ञबली दिले होते; व जे त्याने करावे ते त्याने केले होते. त्याला हे माहित होते की, तो सत्य आहे. आणि समजूया की, त्याच्याकडे सांप्रदायीक मंडळ्याचे सभासद येऊन म्हणू लागले, “ईयोबा, तू हे मान्य कर की तू पापी आहेस, कारण जर तू पापी नसलास तर देव अशी शिक्षा कधी करीत नाही.”

67 परंतु ईयोबाने उत्तर दिले, “मी माझी कबुली दिली आहे. मी होमबलीही दिला आहे, व प्रायश्चितही केले आहे, आणि मी पापी नाहीये.” तो हे जाणत होता की, तो कुठे उभा आहे. तेव्हा त्याची परिस्थिती अधिक खराब होत गेली, व जेवढी बिघडू शकते तेवढी बिघडली, सर्व प्रयत्न हे होते की, ईयोबाला खाली करावे आणि त्याला अशा परिस्थितीत आणावे की, त्याने देवाला व त्याने केलेले होमबली नाकारावे. केलेल्या गोष्टींवर जेव्हा तुम्ही नकारात्मक प्रतिक्रिया दर्शवितात, तेव्हा त्याच क्षणाला तुम्ही निर्बल व देवावर अविश्वास दर्शविला जातो. जर तुम्ही देवाकडे काही मागाल, व त्याचबरोबर अविश्वासही करत राहाल, तर तुम्हाला संशयी म्हटले जाईल, विश्वासी नाही.

68 ईयोब हे जाणत होता की, तो कुठे उभा आहे, व त्याच्या विश्वासाचा पाया भक्कम होता.

69 यात आश्चर्य नाही की, परोनितने मरणाच्यावेळी, गीताच्या ह्या पंक्ती बोलल्या

> ख्रिस्त, जो भक्कम खडक, त्यावर मी उभा आहे;
> इतर सर्व जागा खाली दबणारी वाळू आहे.

70 ईयोब अशा खंबीर व भक्कम खडकावर उभा होता, त्याने प्रायश्चित केले होते, त्याच्या प्रिय पत्नीनेही त्याला सोडले होते. जेव्हा त्याचे आरोग्य फार ढासळले, व संपूर्ण सर्व

शरीरावर फोड आले, तेव्हा त्याने आपल्या शरीराला पिघळून टाकले व जन्म दिवसाला शाप दिला. व त्याने म्हटले खरोखर सूर्य न उगवो! व रात्री चंद्रही प्रकाशासाठी न येवो!

त्याच्या पत्नीने त्याला सांगितले होते, "ईयोबा, तुझी परिस्थिती किती दुःखकारक झाली आहे, तू देवाला शाप देऊन का मरुन जात नाहीस?"

71 त्याने उत्तर दिले, "तू मूर्ख स्त्रियांप्रमाणे बोलत आहेस." ईयोब खात्रीशीर होता की, परमेश्वर आहे, व त्याने त्याला होमबली अर्पिले आहे. हो, मी हे विचार करुन मला आत्मिकतेची भावना येत आहे. त्याला हे माहित होते की, त्याने देवाच्या मागण्या पूर्ण केल्या आहेत. आणि त्यामुळे ते काम समाप्त झाले होते. देव त्याचा विश्वास पारखत होता. तो तुमचा विश्वास पारखेल. होय. माझाही विश्वास पारखील.

72 परंतु जेव्हा आम्ही त्याच्या मागण्या पूर्ण करतो. असे लिहीले आहे की, "पश्चाताप करा व तुमच्या पापांचे मोचन व्हावे, म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल." हे त्याचे अभिवचन आहे. "तुमच्यामध्ये जर कोणी दुखणाईत आहे काय? त्याने मंडळीच्या वडिलांना बोलवावे आणि त्यांनी प्रभूच्या नावाने त्याला तेल लावावे व त्याच्यावर ओणवून प्रार्थना करावी. विश्वासाची प्रार्थना दुखणाईतास वाचविल, आणि प्रभू त्याला उठवील." म्हणजे त्याची पूर्णता होते. "आपली पातके एकमेकांजवळ कबूल करा, आणि एकमेकांसाठी प्रार्थना करा." तेव्हा तुम्ही देवाच्या मागण्या पूर्ण करता.

73 "विश्वास ठेवणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील. माझ्या नावाने ते भूते काढतील नव्यानव्या भाषा बोलतील, सर्प उचलतील व कोणताही प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही; त्यांनी दुखणाईतांवर हात ठेवले म्हणजे ते बरे होतील." येथेच त्याची पूर्णता होते.

74 परमेश्वराविषयी निश्चिंत असा, तुमच्या हृदयात खात्रीशीर असा, व विश्वास करा की, हे देवाचे वचन आहे, ईयोबाने हेच केले होते.

त्याची पत्नी म्हणाली, "का तू देवाला शाप देऊन मरुन जात नाही? का, तू अधिक खालावत चालला आहेस?"

75 कसे सैतान या गोष्टी करुन तुम्हाला हादरु पाहतो. "का, तुझ्यामध्ये काही सुधारणा नाही होत आहे, तुला अभिषेक केल्यापासून अगोदर होता तसाच आहे. त्या प्रचारकांनी प्रार्थना केल्यापासून तुझ्यामध्ये काही सुधारणा झाली नाहीए. सर्वप्रथम ते प्रचारक बरोबर नव्हते." त्या प्रचारकांविषयी काहीच मोजणे नाहीए. येथे जिवंत देवावरील तुमच्या विश्वासाला मोजण्यात येते. प्रचारकाला अर्थ नाही, तर देवाला अर्थ आहे. प्रचारकांनी कधी अभिवचने दिलेली नाहीत, देव अभिवचने देतो. म्हणून ते प्रचारकावर नसून ते देवावर अवलंबून आहे. आणि तुमचा विश्वास जो भरवसा ठेवतो की देव आहे. म्हणून देवाविषयी निश्चिंत असा. तो देव आहे ह्याविषयी निश्चिंत असा, हेच देवाचे वचन आहे. आणि देव आपल्या वचनात राहतो.

76 ईयोबाने आपल्या पत्नीला म्हटले, "तू मूर्ख स्त्रीयांप्रमाणे बोलत आहेस." त्याने म्हटले, "देवाने दिले व देवाने नेले; धन्य परमेश्वराचे नाम." तो निश्चिंत होता की देव आहे.

77 आणि जसे त्याने हे शब्द उद्गारले, मेघगर्जना व विजांचा लखलखाट चालू झाला. व देव दृश्यात आला. त्याला अशी परिस्थिती स्वतःहून बोलवते. परमेश्वर फार वेळेपर्यंत उगा राहतो.

78 आजही तो हे करत आहे, नरकाकडे जाणारे अमेरिकन लोक, व मंडळीच्या ढोंगी लोकांना पाहा. मी रागात नाहीये. परंतु ज्यांचा देवाशी संबंध चांगला आहे त्यांना पाप क्रोधीत करते. मी या देशाशी, व देशांतील लोकांशीही रागात नाहीए, परंतु मी सैतानावर क्रोधीत आहे ज्याने या कारणांनी लोकांना आंधळे केले आहे.

79 हे आंधळे पाळक व प्रचारकांनी मनुष्यांच्याद्वारे बनविलेले देवज्ञानशास्त्र घेऊन यावे. तुम्हाला वास्तविक नव्याने जन्मावे लागेल. आणि देव आपले वचन पूर्ण करील. त्याने सेवकाईला आरंभ करण्याअगोदर देवाचे बोलावणे त्याला आहे की नाही हे पारखावे, तुम्हाला ही गोष्ट खात्रीशीरपणे माहीत असणे गरजेचे आहे की, तो व्यक्ती देवापासून आहे. कारण असे लिहीले आहे की, "ते सुभक्तीचे केवळ बाह्य स्वरुप दाखवतील, परंतु सामर्थ्य नाकारणारे होतील."

80 ती गरीब, विधवा स्त्री, हे जाणत होती की देव आहे. तिच्या पिठाची बरणी खाली, खाली, खाली होत गेली, व परिस्थिती वाईट, वाईट, होत गेली. परंतु देव असे होवू देत होता. कारण अशा परिस्थीतीत त्यांना जावू देणे त्याला आवडते. तो हे पसंत करतो की तुमचा विश्वास पारखाला जावो व पाहिले जावे की तुम्ही कशी प्रतिक्रीया दर्शविता, तो तुमच्या परिस्थितीला अधिक दयनीय करतो. जेव्हा तुमच्यासाठी प्रार्थना केली गेलीय. तेव्हा तो म्हणतो, "सैताना, आता ये आणि याची पारख कर. कारण मला माहीत आहे की तो माझ्यावर विश्वास करित आहे." हे प्रभू परमेश्वरा तू युगानुयुग धन्यवादीत असो! हो, हो! [ब्र. ब्रॅन्हम दोनदा टाळ्या वाजवतात—संपा.] "त्याची परिक्षा घे. मला माहीत आहे की त्याने माझे वचन ग्रहण केले आहे." काय असे देव तुमच्याविषयी म्हणेल काय?

81 त्याने असे ईयोबाविषयी सांगितले. देव म्हणाला, "तुला जे वाटते ते तू कर, परंतु त्याच्या जीवाला हात लावू नको, कारण मला माहीत आहे की, तो माझ्यावर प्रेम करितो. त्याने होमबली अर्पिले. त्याने सर्व माझ्या मागण्या पूर्ण केल्या. त्याला सांगितलेले सर्वकाही त्याने पुर्ण केले आहे, आणि त्याने विश्वास ठेवला आहे. आता तुला वाटत असेल तर निखाऱ्यांच्या राशीवर त्याला ठेव." सैतानाने त्याचे सर्वस्व हिरावून नेले होते. देवाने त्याच्या बदल्यात त्याला दुप्पट परत दिले. होय, परमेश्वर असेच करतो.

82 तो आमच्या विश्वासाची परिक्षा करतो, की काय आम्ही खरेच त्याच्यावर विश्वास करतो की तो देव आहे.

83 यात काही संशय नाही, की त्या स्त्रीने सांगितले, "मी प्रार्थना केली. मी प्रार्थना केली. मला माहीत आहे की मी लायक नसलेली परराष्ट्रीय आहे."

84 आठवण करा, येशूने स्वतः बायबलमध्ये तिच्याविषयी सांगितले त्याने म्हटले, "काय एलियाच्या दिवसात पुष्कळ विधवा स्त्रीया नव्हत्या काय? परंतु त्याला एकाच विधवेच्या घरी पाठविण्यात आले, जी परराष्ट्रीय होती."

85 "ओह, " त्याने म्हटले, "माझी प्रार्थना करुन झाली आहे." कदाचित, ती शेवटचा भाकरीचा तुकडा पाहून विचार करते, की मृत्यु माझ्या फाटकांत व दरवाज्यात प्रवेश करित आहे. फक्त एक तुकडा तीने खावा व ती व तिचा मुलगा दोघेही मरणार. मी त्या स्त्रीला रात्रभर, प्रार्थनेत, असलेली पाहत आहे, जेव्हा फार उष्ण हवा जमिनीवर सुटली होती, व जमिनीला भेगा पडल्या होत्या, रस्त्यावर लोक किंचाळत होते. अशावेळी ती आपल्या पुत्रावर एक नजर टाकून बाहेर पडली. तिने आपल्या मूलाचा फाटलेला पायजमा पाहिला; ज्यातून बारिक झालेले पाय बाहेर आले होते. ती हताश अवस्थेत आपल्या सुरकुत्या पडलेल्या हाताकडे, पाहू लागली. परंतु तीने हेच सांगितले की, "मला ठाऊक आहे तो परमेश्वर आहे. मी माझ्या सर्व पापांचा अंगीकार केला आहे. मी परमेश्वराच्या

आवश्यकतेनुसार सर्वकाही केले आहे. मी आता आमच्यासाठी जीवन मागत आहे, त्याच्या गौरवासाठी." परमेश्वराने तिच्यावर दृष्टी केली.

86 बाकी लोक सगळे बाहेर जाऊन नाचत होते, लोक आजच्या दुरदर्शन कार्यक्रमाप्रमाणे, आपल्याला तयार करीत होते, व जगाच्या गोष्टीत, गुंतले होते. परंतु ती एकटी स्त्रीच परमेश्वराच्या सहभागीतेत होती.

87 दिवस उगवला होता. ती म्हणाली, "हा बिचारा मुलगा संपूर्ण रात्रभर भुकेमुळे रडत राहिला आहे. मी या मूठभर पिठाने काय करु?"

88 तुम्ही जाणता, की ते पीठ ख्रिस्ताचे प्रतिक होते. पवित्र शास्त्राचा कोणीही विद्यार्थी हे समजतो की ख्रिस्त हा अन्नबली होता. आणि त्या अन्नबलीला विशेषप्रकारे, त्याला वाटले जात होते, यासाठी की प्रत्येक धान्याचा आकार समान बनला जावा; कारण प्रभू येशू ख्रिस्त काल, आज, व युगानुयुग सारखाच आहे. आणि प्रत्येक विश्वासी विश्वास करतो व त्यावर निर्भर राहतो. हालेलुया! तुमच्याकडे तो जुना, थंड पडलेला औपचारिक धर्म का असेना. परंतु माझ्यासाठी, हा विश्वास आहे की येशू ख्रिस्त काल, आज, व युगानुयुग सारखाच आहे. मी धर्मनिंदकामध्ये माझ्या विश्वासावर टिकून आहे. मी आजही तोच विश्वास करीत आहे की तो काल, आज, व युगानुयुग सारखाच आहे.

89 त्या वाटल्या गेलेल्या धान्याचे तुकडे सारखे होते कारण तो प्रभू सारखाच आहे. तो आज सकाळीही, तोच प्रभू आहे. जो तेव्हा होता व तो कायमचा सारखाच राहील. अन्नबलीचा हाच अर्थ आहे

90 आणि तेलाचा अर्थ पवित्र आत्मा आहे, हे आम्ही यहेजकेल याच्या 4 अध्यायाप्रमाणे आम्हाला समजते. म्हणून आम्ही याच कारणांमुळे तेलाचा अभिषेक करतो; म्हणजे आत्म्याचा अभिषेक केला जातो. हे काय आहे? संत योहान 4 मध्ये, लिहीलेले आहे "पिता परमेश्वर आपली उपासना आत्म्याने व खरेपणाने करणाऱ्यांना शोधीत आहे." येशू हाच सत्य आहे. व तोच अन्नबली होता, आणि तेल आत्मा होता. आणि आत्मा, सत्याबरोबर मिश्र केल्यावर, काही ना काही घडवून आणीलच. या दोघांना मिळवूया, त्याने एक जेवण बनते. हो!

91 तुमचा विश्वास कुठे आहे? जेव्हा देवाचे वचन प्रचार केले जाते तेव्हा ते सरळ व साधेपणामध्ये असते, तरी त्याचे सामर्थ्यही असे असते, ज्यातून येशू ख्रिस्त काल, आज, व युगानुयुग सारखाच आहे हे प्रकट होते, आणि वचन जेव्हा अन्नबलीच्या स्वरुपात दिसते, तेव्हा त्यात आपल्याला आत्म्याचे तेल मिसळावे लागते. कदाचित तो मुठभर असू शकतो, किंवा चमचभर का असेना, परंतु तो खरा असतो.

92 आता हे तेल घातलेले अन्नबली कशासाठी तयार केले आहे? हे वधस्तंभासाठी आहे. हे स्वतःच्या बलिदानासाठी तयार आहे. हीच ती गोष्ट आहे जी आम्हाला करणे आहे. जर वचन प्रचार केलेले आहे, तर देवाचा आत्मा त्यात मिसळा, तेव्हा ते आमच्यासाठी स्वतःचे–बलिदान ठरेल, तेव्हा प्रत्येक वेदना, आजार, व जे देवाच्या वचनाच्याविरुध्द आहे ते नाकारले जाईल, व वचन पकडून उभे राहू शकू.

93 तेव्हा तुमचा डॉक्टर म्हणेल, *असे*, *तसे*, किंवा *काहीही* बोलो; त्यात काही अंतर पडणार नाही. त्यावर उभे राहा, कारण परमेश्वराने असेच सांगितले आहे. जेव्हा अन्नबलीच्या स्वरुपात वचन आपल्या जवळ येते तेव्हा आमच्याकडे आत्म्याच्या स्वरुपात जे तेल आहे. ते त्यांमध्ये मिसळा.

94 आता, मी एक आवाज ऐकत आहे. आता दिवस सरत चालला आहे. एक शब्द ऐकला, आणि म्हणाला "उठ बाहेर अंगणात जा व दोन काठ्या घे." काय तुम्ही लक्ष दिले, वचन म्हणते. "दोन काठ्या?" म्हणजे वधस्तंभ. तिच्याकडे ते पीठ व तेलही आहे, परंतु तिला त्याचा उपयोग करायला सांगितले, कृती कर. तुमच्याकडे पीठ व तेल कितीही का असेना, आमचे काम कृती करण्याचे आहे, त्याचा वापर करणे आहे; स्वतःचे बलिदान करायचे आहे.

95 दोन काठ्या जुन्या काळात त्यांना आग लावण्यासाठी दोन काठ्यांशिवाय दुसरे काही नव्हे. एका काठीवर दुसरी काठी क्रुसासारखी ठेवून जर आग मध्यभागी लावली, तर त्या दोन्ही काठ्या पेटू लागतात. रेड इंडियनही अशाप्रकारे आग पेटवित असत. मीही स्वतः अशाचप्रकारे आग पेटवून पुष्कळ वेळा, संपूर्ण रात्र घालविली आहे. एक ओंडका घेऊन, त्याला एक *असा* व दुसरा *तसा* असे क्रुसासारखे ठेऊन जर पेटवले तर आग पेटत राहील, व त्याला पुढे आगीमध्ये सरकवत ठेवावे लागते.

96 "दोन काठ्यांची गरज होती" व ते क्रुसाचे प्रतिक होते. तिला एक आवाज आला "अंगणात जा व दोन काठ्या आण." त्याचवेळी त्या डोंगरावरुन एक मोठी गर्जना त्या संदेष्ट्यासाठी झाली व ती वाणी म्हणाली, "त्या शहरात जा. जेथे मी तुला आज्ञा दिली आहे." हे प्रभू! दोघांनीही देवाच्या आज्ञेचे पालन केले. व त्यामुळे काहीतरी विशेष घडणार होते. दोघांनीही आज्ञा पाळली.

97 जर प्रचारकाचे प्रचार केलेले शब्द, जर कोणी स्विकारील व त्यावर विश्वास करील व कृती करील, तर काहीतरी खास असे घडतेच. जर तुम्ही पापी असाल, तर तुमचे तारण होईल. जर आजारी असाल, तर निरोगी होणारच, कारण देवाने त्याचे अभिवचन दिलेले आहे, जर आम्ही त्याच्याविषयी निश्चयी असलो तर.

98 जेव्हा आम्ही देवाविषयी पूर्णतः निश्चिंत असतो, तेव्हा तो परमेश्वर आहे. जो निश्चित स्वरुपात आपले वचन आमच्यासाठी पूर्ण करतोच! नंतर त्याला आज्ञा झाली की, "तू त्या शहरात जा, मी एका विधवेला आज्ञा दिली आहे" एक दृष्टांत त्या संदेष्ट्याला दिसला. तो उठून निघाला, आपल्या वाटेने. तो कुठे चालला आहे हे त्याला माहीत नव्हते; त्यात काहीच फरक पडत नाही कारण तो देवाची आज्ञा पाळत होता.

99 तेथे त्या स्त्रीला माहीत नव्हते की काटक्या कोठे मिळतील, परंतु त्या अंगणामध्ये कुठेतरी त्या दोन काटक्या होत्या. ती स्त्री तेथे बाहेर अंगणात जाण्यास निघाली. तिने आजूबाजूस बघितले व म्हटले, "ओह, फार उष्म आहे!" रस्त्यावरुन आरोळी येत होती. जे रात्र भरभटकणारे, दारुडे लोक, किंचाळत येत जात होते, कशाप्रकारे त्यांनी रात्री दारु प्याले होते. तिने रस्त्यावर पाहिले, तेव्हा तिला काटक्या तेथे दिसल्या नाहीत. तिला एक काठी मिळाली; जी त्या वधस्तंभाचा भाग होता, स्वतःचे बलिदान ते दर्शवित होते. नंतर तिला दुसरी काठी, ही मिळाली. आणि जेव्हा तिने दुसरी काठी उचलली तेव्हा क्रुसपूर्ण झाला…

100 हो; हे किती दुःखद चित्र असेल, कारण मृत्यु तिच्या दाराजवळ होता. ती व तिचा मुलगा त्या भाकरीच्या तुकड्याला खाऊन मरणार होते. कारण तेवढेच होते. कधी कधी खिन्नतेच्या वेळेला, वाणी ऐकू येते.

101 जेव्हा तिने ती दुसरी काठी उचलली व परत जाण्यासाठी वळली, तेव्हा बाहेरील दारातून वाणी ऐकू आली, म्हणाली, "मला प्यायला भांड्यात थोडे पाणी आणून दे."

102 त्या स्त्रीने आपल्या हातात त्या दोन काटक्या पकडून ठेवल्या व वळून पाहीले, की पीठ व तेल हे तयार होते. तिने म्हटले ते मळून तयार आहे. हे असे आहे, की जसे वचन व

आत्मा मिसळले जातात व स्वतःच्या बलिदानासाठी क्रुसावर दिले जातात, यासाठी की जे काही वचनाविरुध्द आम्ही मागितले आहे त्याचा नकार करावा. हे योग्य आहे. "मी ते एकत्र मिसळले आहे व त्याला काटक्यांवर मी ते जाळून भाजून घेईन."

आणि तो आवाज म्हणाला, "मला प्यायला भांड्यात थोडे पाणी आणून दे."

103 ती बघते, की एक मनुष्य बाहेर उभा आहे व फाटकाजवळ टेकला आहे, त्याचे गाल उतरलेले, दाढी वाढलेला, व टक्कल पडलेला, त्या फाटकाजवळ आजुबाजूस पाहत आहे, त्याने जूने असे कोकऱ्याचे कातडे पांघरलेले होते. व तो दयाळू, नम्र व वृध्द व्यक्ती भासत होता, व पाहत उभा होता.

104 तिने विचार केला, "मी हे पाणी त्याला देईन." जीवनाचे पाणी, जे तुम्ही कोणालाही व कुठेही देऊ इच्छिता. "एक क्षण थांबा, महाशय." आपल्या हातात काटक्या घेऊन, ती निघाली.

105 आणि त्या व्यक्तीचा आवाज पुन्हा गर्जला, "फक्त पाणीच नाही, तर माझ्यासाठी एका भाकरीचा तुकडा घेऊन ये." जीवनाची भाकर, जीवनाचे पाणी! काय हा भाकरीचा तुकडा तिच्या जीवनाचा भाग होता? होय. कारण ते समाप्त होताच मरावे लागले असते. तिला सांगितले गेले की, "मला पाणी आण व तुझी भाकरही आण."

106 येथे आम्ही कोणता धडा शिकतो? काय बोध आम्ही घेतो? हेच की "पहिल्यांदा तुम्ही देवाचे राज्य मिळविण्यास झटा, आणि त्याचे सर्व नीतिमत्त्व, म्हणजे इतर गोष्टींही तुम्हास आपोआप मिळतील."

"मला थोडे पाणी व भाकरीचा तुकडा घेऊन ये."

107 तेव्हा ती फार नाराज झाली. मी पाहात आहे की तीने सांगितले, "महाशय, " काहीशा अशाप्रकारे, "मी जेवढे मनुष्य पाहिले, तुम्ही तर मला वेगळे वाटत आहात, आणि तुमच्या बोलण्यावरुन, मला तुमच्या बोलण्यावरुन होकारात्मक वाटत आहे. परंतु माझ्याजवळ, एक मुठभर पीठ, व एक चमचाभर तेल राहिले आहे. त्यांना मळून, मी या दोन काटक्यांवर भाजण्यास जात आहे. मग मी व माझा मुलगा आम्ही खाऊन, मरणार आहोत. कारण माझ्याकडे ह्यांच्याशिवाय काहीच वाचलेलं नाहीए."

108 त्यानंतर, काय झाले, आम्ही काय ऐकतो? "परंतु माझ्यासाठी पहिली, भाकर घेऊन ये." प्रथम देव. कोण काय म्हणेल, परिस्थिती काय आहे, परिस्थिती निराशजनक का न होवो, देवाला प्रथमस्थान द्या. त्याचे वचन पहीले.

109 "डॉक्टर म्हणतो कि मी बरा होऊ शकत नाही." परंतु त्याचे वचन प्रथम. "मी पाप्यांतला पापी आहे. मी एक वेश्या आहे. मी जुगार खेळणारा आहे. मी नशापान करणारा आहे."

परमेश्वराच्या वचनाला पहिले प्राधान्य द्या. "जरी तुमची पातके लाल रंगाची का असेना, तरी ती बर्फासारखी पांढरी होतील; लाखेसारखी लाल असली, तरी लोकरीसारखी शुभ्र निघतील." देवाला पहिले स्थान.

110 "जा, व माझ्यासाठी पहिली भाकर घेऊन ये. जे काही तुझ्याकडे आहे, ते घेऊन ये." काय तुम्ही तुमचे सर्वस्व त्या देवाच्या हाती देऊ इच्छिता?

111 मी, माझे जीवन, मी 50 वर्षाचा आहे. "विल्यम ब्रॅन्हम, तुम्ही इच्छीत आहात काय, सर्व माझ्यावर सोपविण्यासाठी. तुम्ही जे लहान मुले, तुम्ही इच्छित आहा काय? आपले जीवन माझ्या हाती सोपवू इच्छिता काय? काय तुम्ही इच्छिता काय? आजारी व्यक्तिंनो, तुम्ही हे कराल काय? माझ्यावर भरवसा कराल काय? मला प्रथम प्राधान्य द्या."

112 त्या स्त्रीला सांगितले गेले होते की, “माझ्यासाठी आपल्या हाती भाकर घेऊन ये व पाणीही घेऊन ये.” तीने त्याच्याकडे पाहिलं. व तिला आतून आवाज सांगत होता की ह्या माणसाच्या बोलण्यात प्रभाव आहे.

परमेश्वर आपल्या मेंढरास ओळखतो. “माझी मेंढरे माझी वाणी ओळखतात. त्यांना माहीत आहे की ते पवित्र वचनात आहेत किंवा नाहीत, ते बरोबर आहे की चुकीचे आहे.”

113 ती, आज्ञापालनासाठी वळाली, हेच आम्हीही केले पाहीजे. आणि जेव्हा ती त्या संदेष्ट्याच्या शब्दाचे पालन करण्यासाठी वळाली तेव्हा आकाशातून मेघगर्जनेसारखा आवाज झाला, जे ऐकण्यासाठी लोक उत्सुक होते. कारण, संदेष्ट्याच्या आवाजात मेघगर्जना होती, यासाठी की प्रत्येक पापी व आजारी व्यक्ती तो आवाज ऐकू इच्छित होते, “प्रभू परमेश्वर असो म्हणतो.” आमची किती तळमळ हा शब्द ऐकण्यासाठी होते!

114 लोक माझ्या मार्गात असता, आवाज देऊन म्हणतात, “आमच्या दारी या. माझी मुलगी *अशा* अवस्थेत आहे. माझी लहान मुलगी, फार वाईट दशेत आहे. फक्त शब्द बोला.” परंतु हे तुम्ही कसे बोलू शकता? जर परमेश्वर ते वचन मुखात घालत नाही? परंतु ते ऐकण्यास इच्छुक होते, “प्रभू परमेश्वर असे म्हणतो.”

115 तेव्हा तो व्यक्ती, कुंपणाच्याजवळ आला, कारण तिने आज्ञापालन केले असे त्याने पाहीले. व निराशेचा भंग केला: “प्रभू परमेश्वर असे म्हणतो. जोपर्यंत परमेश्वर या भुमीवर पाऊस पाडत नाही, तुझ्या कुपीतील तेल आटणार नाही, व बरणीतले पीठ संपणार नाही.” काय सांत्वन केले गेले!

116 तिने भाकर बनविली. व त्या संदेष्ट्याकडे घेऊन आली. ती परत आत गेली व आपल्या मुलासाठी व स्वतःसाठी भाकर बनविली. त्याने खाणे–पिणे केले व तृप्त झाले, फार मुबलक शिल्लकही राहीले. हे सर्व कुठून आले? ते सर्व कसे उत्पन्न झाले? विज्ञानशास्त्राद्वारे मला सांगा की हे भोजन कोठून आले? ते तेल कुठून आले? त्या कुपीत तेल कसे भरले गेले?

117 सकाळी जेव्हा ती ते पीठ घेत होती व तेलही तेव्हा ते पात्र खाली होत असे. परंतु पुन्हा ती जाई तेव्हा दोन्ही पात्रे भरलेली आढळत. हे सर्व कुठून आले होते? देवाला त्याच्या वचनासह घ्या. व देवाविषयी निश्चित असा. तो उत्पन्नकर्ता आहे.

118 असेही असू शकते, तुमचे स्वास्थ ढळले असेल. तुम्ही तुमची सहभागिता गमावलीही असेल. परमेश्वराच्या प्रती तुम्ही भरवसा ठेवा. व निश्चिंत असा. त्याच्या वचनानुसार त्याला पकडून ठेवा. निराशजनक परिस्थितीही तुम्हाला तेवढी निराशजनक वाटणार नाही जर तुम्ही त्याचे वचन पकडून राहिले व देवाविषयी निश्चिंत असले तर, कारण तो परमेश्वर आहे.

119 मी जर्मनीमध्ये, एकवेळी, एक चित्र पाहिले होते, ते नेहमी मला विचार करण्यास लावते. जर्मनीच्या त्या एका चित्र…काराने हे चित्र रंगविले होते त्याला—त्याला, “ढगांची भूमी” हे नाव दिले होते. आणि जर तुम्ही ते चित्र दुरुन पाहिले तर त्या चित्रात निराशजनक वातावरण दिसत असे. जसे ढग–एकमेकांत जमा होऊन दिसत होते आणि जर तुम्ही ते दुरवरुन हे चित्र पाहीले तर. परंतु जेव्हा तुम्ही त्या चित्राला जवळून पाहता, तेव्हा ते वेगळेच दिसते. वास्तविक ते ढग नसून देवदूतांचे पंख होते, जे देवाला हालेलुयाह गात होते. तसेच कधी–कधी निराशाही अशीच दिसून येते. जर तुम्ही त्याकडे दुरुन पाहीले तर ते निराशाज नकच भासते. परंतु देवाला त्याच्या शब्दांसह घ्या व पूर्णतः निश्चिंत असा की, तो देव आहे व त्याच्याजवळ जा, तेव्हा तुम्हाला ते चित्र जणू देवदूतांचे पंख हालत व गात असलेले दिसतील.

120 ती स्त्री अब्राहामासारखी होती, जिला सांगितले गेले की आपले सर्वकाही वेदीवर अर्पण कर. होऊ शकते की आजच्या सकाळी परमेश्वर, तुम्हाला बोलावीत आहे. तुमचे मार्ग सोडा. तुमचा अविश्वास सोडून द्या. तुमचे जे ते सर्व सोडा. आणि तेल व वचन घ्या, व ते एकमेकांत मळून घ्या, व स्वतःला स्वःअर्पण असे वेदीवर सादर करा. तेव्हा देव दृश्यात आला असे तुम्हास समजेल, ते इतके निश्चिंत की जसा मी या व्यासपीठावर उभा दिसत आहे.

मी प्रार्थना करण्यास जात आहे म्हणून तुम्ही याविषयी विचार कर.

121 आज तुम्ही काही गरजा मागू इच्छिता? काय तुमची अशी काही गरज आहे की तुम्ही ती गरज शारिरीकरित्या मिळवू शकत नाही? काय पैसे कमी असून भाडे भरण्याची ऐपत नाही? मुलांना नविन बुट हवे आहेत. परंतु ते विकत घेण्यासाठी जवळ पैसे नाहीत? काय तुमच्या घरातली बरणी व कुपी आटत चालली आहे का? काय तुमच्या जनावरांसाठी खाद्य विकत घेऊ शकले नाहीत? आणि, समस्या आहेत? आठवण ठेवा, देवाने अभिवचन दिले आहे.

122 तुम्ही आजारी आहात, व डॉक्टरने ऑपरेशन करण्यास सांगितले आहे? त्यासाठी तुमच्याकडे पैसे नाहीत? तुमची गरज आहे.

123 तुम्ही पापी आहात काय? तुमच्या गरजा अधिक आहेत काय? परंतु या अवस्थेत जर देवाकडून बोलावणे आले तर तुम्ही नाश पावाल? तुम्ही विश्वातून पतन पावलेले व देवापासून दूर पळत आहा काय? आणि तुम्ही जाणता की तुम्ही एका मंडळीशी जोडलेले आहात, परंतु हे तुम्हाला कळत आहे की, तुम्ही बरोबर नाही आहा. आणि तुम्हाला गरज आहे. हे शब्द तुम्ही काटेरी जागेवर पडू देऊ नका, किंवा दगडी जागेवरही नका. परंतु ते शब्द सुपीक जमिनीवर पडू द्या.

124 जर तुम्ही आजारी आहात व तुम्ही...डॉक्टरने तुम्हाला सांगितले आहे तुम्ही बरे होऊ शकत नाही, परंतु जर तुम्ही देवाला वचन द्याल की, तुम्ही आयुष्यभर त्याची सेवा कराल, व तुम्हाला हा भरवसा आहे की, तुम्ही देवाविषयी निश्चिंत आहा, तर आता त्याच्या अटी पूर्ण करा. जर तुमची गरज आहे, तर तुमची गरज दर्शविण्यासाठी, तुमचे हात देवाकडे उंचावाल का? देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

आपण प्रार्थना करुया.

125 हे प्रभू, जसा मी ह्या व्यासपीठावर आजच्या सकाळी भरवसा ठेवून उभा आहे, मला माहीत आहे ज्यांनी आपले हात उंचावले आहेत अशापैकी कोणालाही तू ओळखत नाही असं नाही, कारण तूच देव आहेस. तू म्हटलेस, “पाच चिमण्या दोन दमड्यांस विकतात की नाही? तरी त्यांपैकी एकीचाही देवाला विसर पडत नाही. तुम्ही त्या चिमण्यांहून कितीतरी अधिक मौल्यवान आहा!” हे जे सर्व मर्त्य मनुष्य ज्यांनी आपले हात वर केले आहेत, ज्यांच्यासाठी तुझा पुत्र येशू मरण पावला आहे! आज सकाळी, जर ह्या चिमण्या पडतील तर त्यांहून अधिक तुझे लक्ष ह्या हात उंचावलेल्या लोकांवर कर! मी विचार करतो... की एक डजनभर चिमण्या ज्या दमडिलाही कोणी विकणार नाही, कारण कोणाची तशी मागणी नाहीए. कारण त्यांना कोठे ठेवावे ही समस्या आहे. परंतु तू त्या सर्वांची काळजी करतोस; त्यांच्या शरीरावरचे सर्व पंखही तू मोजले आहेत. आमच्या डोक्यांचे सर्व केसही मोजले आहेत.

126 हे प्रभू, आमच्या प्रार्थनेचे उत्तर दे. तू देव आहेस, ह्या सकाळी त्यांना निश्चित होऊ दे, आणि हा तुझा पवित्र आत्मा आहे. आजच्या आधुनिक धर्माचे चमकणे व त्यातली कंटाळवाण्या गोष्टींचा प्रभाव निघून जाऊ दे, जे म्हणतात, “मी, *या* मंडळीचा

सभासद आहे." परमेश्वरा, ह्या गोष्टींचा प्रभाव त्यांच्या मनातून, तू आताच काढून टाक. एका क्षणातच, हे लोक सार्वकालिक जीवनाची झलक पाहोत. आणि लोक देवाला जाणण्यासाठी भुकेले होऊन शोध करोत, व समजो की देव कोण आहे, व देवाविषयी निश्चित होवोत. कारण तो आपले वचन पाळतो.

127 आणि पापी लोकांसाठी प्रार्थना करतो की, ते लवकरच पश्चाताप करोत, व स्वतःला येशू ख्रिस्ताच्या नावाने होणाऱ्या बाप्तिस्म्यासाठी तयार करोत. आणि तू अभिवचन दिल्याप्रमाणे त्यांना पवित्र आत्मा मिळो. तू हे म्हटले आहे, प्रभू. तू आपले वचन पाळ.

128 येथे असेही लोक आहेत जे पतित होऊन विश्वासातून मागे हटले आहेत. त्यांनाही निश्चिती मिळो की तूच देव आहेस. ते आज, तुझ्याकडे येवोत कारण तू म्हटले आहेस, "जरी तुमची पापे लाखेसारखी लाल असली, तरी ती बर्फासारखी पांढरी होतील. ती किरमीजासारखी तांबडी असली, तरी लोकरीसारखी निघतील."

129 आणि येथे जे आजारी आहेत, त्यांना ही जाणीव तू दे की तू देव आहेस आणि तू आपले वचन पाळतो. तू वचन पाळतोच. ते जसे आपल्या स्वतःला देत आहेत त्यांच्या तेलासह, व जो आत्मा त्यांच्यात आहे जो विश्वासाची कबुली देत आहे. आणि ते, ही, जीवनाची भाकर जो ख्रिस्त आहे त्यावर ते विश्वास करत आहेत. लोकांसाठी जुना करार; व नविन करार, हे दर्शवितो की ख्रिस्त हा काल, आज, व युगानुयुग सारखाच आहे. लोक त्या वचनाला आपल्या आत्म्याने तेलाने, मळून आपल्या पायावर उभे राहून वेदीसमोर हजर होवोत, ते म्हणोत की, "हे प्रभू, माझ्याजवळ जे आहे, सगळे मी घेऊन येतोय."

हो, ते किती पटीने होईल! कसा इतिहासाचा परमेश्वर जर दृश्यात आला तर काय बोलावणे असेल! कसं असेल की यहोवा उठेल, ज्याचे हृदय दुःखी आहे, "जो म्हणतो माझा मुलगा आज्ञाधारक आहे. मी त्याला परिक्षेतून जाऊ देत आहे, व त्याने हे सिध्द करुन दाखविले आहे की तो माझ्यावर प्रेम करतो व विश्वास करतो. तो माझ्याविषयी निश्चिंत आहे." कारण असे म्हटले आहे की, "जो देवाकडे येतो त्याने प्रथम हा विश्वास केला पाहिजे की तो आहे, व जो त्याचा झटून शोध करतो, त्याला प्रतिफळ देणारा आहे." हे प्रभू, ह्या वेळेला हे घडवून आण, आम्ही स्वतःस तुझ्या हाती देतो.

130 आणि, आता, आमचे मस्तक झुकलेले असताना, आणि जे येथे गरजवंत आहेत, त्यांनी उभे राहावे…ज्यांना निश्चिती नाहीए की तो देव आहे… परंतु जर तुम्ही—जर तुम्ही देवावषयी निश्चिंत आहात, तर तो आपले अभिवचन पाळतो, उध्दार, आरोग्यदान, अजूनही जे काही आहे, जर तुम्ही देवावषयी निश्चिंत असाल, तर आपल्या जागी उभे राहा. जर तुम्हाला दुसऱ्या व्यक्तीसाठी प्रार्थना करावयाची आहे तर उभे राहा. जर तुम्हाला ह्याविषयी निश्चिंती आहे की, देव आहे तर पवित्रांच्या सभेत आपली विनंती त्याला सादर करा. तुम्ही हे करत राहा व उभे असा…[टेपवर रिकामी जागा—संपा.]

"मला खात्री आहे की तो देव आहे. मी विश्वास करतो की तो आपले वचन पाळतो. आणि मला खात्री आहे की तो विनंती…मी विनंती ह्यावेळी, रक्ताखाली आणतो." जर तुम्हीही तसे करीत आहा, तर पाप सोडून द्या. कारण प्रत्येक पापे ही "अविश्वासाला" दर्शवितात. तुम्ही मंडळीचे सभासद असू शकता, परंतु माझे म्हणणे हेच की, अविश्वास हे पाप आहे. तुमचा अविश्वास तुम्ही बलिदानाच्या स्वरुपात ते द्या. ते तुम्ही आता अर्पण करीत आहा. तुम्ही त्या वधस्तंभाजवळ येत आहात. तुम्ही तुमच्या, अविश्वासाचे बलिदान करीत आहात. आणि त्याच्याकडे ते द्या आणि जाणा की तो आहे, व भरवसा धरा की तो तुम्हाला उत्तर देईल. जर तुम्ही तसे आहात, तर आपले हात वर करा. व तसेच राहा.

131 प्रभू, तूच देव आहेस. येथे त्यांचे तेल व पीठ मळून आहे. त्यांनी ते वधस्तंभाजवळ आणले आहे, जेथे देवाचा अग्नी त्यांच्या हृदयांवर पडणार आहे, जर ते तसेच पकडून आहेत तर त्यांचे अर्पण भस्म कर. तू दृश्यात ये, व कार्य कर, लपलेले पाणी उचंबळून स्वर्गातून येवो. त्या अग्नीच्या रथांतून. तू त्यांना बक्षिसे देण्यासाठी स्वर्ग व पृथ्वी हादरुन सोडशील.

132 त्यांनी आपले हात वर करुन उभे असताना, ते दर्शवीत आहेत की, ते विश्वास करित आहे, व स्वतःला रचले आहे, आणि ज्या प्रत्येक विनंत्या त्यांच्या आहेत, त्या वेदीवर ठेवल्या आहेत. हे आकाश व पृथ्वीच्या देवा, आकाश व पृथ्वीच्या न्यायधीशा, आम्ही खात्री बाळगतो की स्वर्ग व पृथ्वी याचा न्याय तू नितीमत्वपूर्वक करशील. खात्रीपूर्वक तो आपले वचन पाळतो, तू जो पुरुषाचे हृदय जाणतोस, व स्त्रीयांचे हृदय जाणतोस, या लोकांचे हृदय जाणतोस.

133 प्रभू देवा, मी माझे स्वतःचे हात उभारतो, कारण मला समजते की, माझ्या सेवकाईमध्ये आता बदल होत आहे. मी विश्वास करीतो की तू आहेस. मी तुला अग्नीस्तंभात उभे असलेले पाहिले आहे. [ब्र. ब्रॅन्हम व्यासपीठावर तीनदा वाजवतात—संपा.] मी तुला पाहिले आहे की तू मनुष्यांच्या हृदयांतील गुप्त जाणतोस, कधीही तू हृदय शोधण्यात अपयशी झाला नाहीस. तुझ्या अभिवचनाद्वारे जे पलिकडचे, ते तू घडविलेस, जेव्हा तू हे करण्यास आरंभ केला. आणि तू मला राखले जगभरात व सर्वत्र, सगळीकडे. मला ही खात्री आहे कारण तू देव आहेस. मी त्याविषयी निश्चिंत आहे.

134 या लोकांबरोबर मीही स्वतःला तुझ्या हाती देत आहे. तुझ्या सेवेसाठी आमचे सर्वस्व तुला देतो हे प्रभू. मी पुन्हा जगभर हिंडणार आहे व त्याची सुरुवात करीत आहे. मला मदत कर हे परमेश्वरा. जर मी कधी तुझ्यावर अविश्वास केला असेल, तर मला माझ्या पापाची क्षमा कर. माझ्या अविश्वासाबदद्ल क्षमा कर. मी जाणतो की तू आहेस, आणि जो तुझा शोध करतो त्याला तू प्रतिफळ देणारा आहे.

135 त्याचप्रमाणे, माझ्या लोकांच्या पापांची कबुली देत आहे, आजच्या सकाळी, त्यांची अशक्तता व संशयाबद्दल, ते उभे असून आपले हात वर करित आहेत. मी त्यांच्या पापांची कबुली देत आहे, हे प्रभू, व आमच्या अशक्तपणाबद्दल. आपला पवित्र आत्मा आम्हावर पाठीव, तुझ्या मान्यतेचा शिक्का म्हणून, कारण तू देव आहेस. आणि तू येथे आहेस. आम्हाला स्विकारण्यासाठी, व आपल्याजवळ घेण्याकरिता, व आमच्या हरवलेल्या सर्व गोष्टी परत आम्हाला मिळवून देण्यासाठी. जर ते आमचे आरोग्य असेल, तर ते 100 पटीने परत मिळो. जर तो आमचा जीव असेल, तर तो फुलणारा, व चमकणारा बनो, पवित्र आत्म्याने भर, यासाठी की देवासमोर आम्ही उभे राहू शकू. जर तो अविश्वास असेल, तर हे प्रभू डोंगर ढळविणारा विश्वासाद्वारे तो आम्हास परत मिळो. हे प्रभू, असे तू घडवून आण.

136 आम्ही विश्वास करितो, की तू फिरत आहेस, पवित्र आत्मा या इमारतीला व्यापून टाकत आहे व ह्या लोकांवर व त्यांच्या हृदयात, तू फिरण्यासाठी, की त्यांनी जिवंत देवाला स्विकारावे. ही प्रार्थना आम्ही येशू ख्रिस्ताच्या नावाने करतो.

माझा विश्वास तुझ्याकडे पाहतो.  
तो जो कलवरीवरचा कोकरा,  
दैवी उध्दारकर्ता;

माझे ऐक मी प्रार्थना करीत आहे,
माझी पापे माझ्यापासून दूर कर,
मला यापुढे भटकू देऊ नको,
तुझ्या बाजूने.

137 तुम्हाला खरंच म्हणायचं आहे काय? तुम्ही ते स्विकारत आहा काय? आपले हात उभारा, असे म्हणा, "मी विश्वास धरतो, मी आता स्विकारत आहे."

जीवनाच्या दाट चक्रव्यूहात मी चालेन,
आणि जरी बाजूला दुःख पसरेल,
तू माझा मार्गदर्शक बन;
मागणी करतो की अंधारातून दिवस येऊ दे,
दुःख पुसून टाक व भिती घालीव,
मला कधी भटकू देऊ नको,
तुझ्यापासून दूर.

आपल्या माना झुकवू या.

138 यानंतर शिस्तसंबंधी, कठीण–संदेशवचने; उध्दट वाटण्यासारखी तुमच्यापुढे कर्णकटू पध्दतीने आणली आहेत, परंतु हा सत्य संदेश आहे. आणि जर तुम्ही नम्रपणाने विश्वास कराल जे तुम्ही मागितले आहे, त्याबाबतीत, तर ते तुम्हाला प्राप्त होईल, त्या सरळ मार्गापासून कोणीही दूर न सारो. स्थिर उभे राहा. यात काही तथ्य नाही की मी किती प्रचार केला, जे काही मी करतो, किंवा दूसरा व्यक्तीही काही करतो, त्याचा काही लाभ घडत नाही जोर्यंत ते आपण स्विकारत नाही की, माझी स्वतःची वैयक्तिक मिळकत आहे.

139 जर तुम्ही संपूर्ण हृदयापासून विश्वास धरता, ज्या गोष्टीविषयी इच्छिता, जर तुम्ही आपल्या पातकांची कबुली दिली, तर देवाने क्षमा केली आहे. त्यावर तुम्ही कधीही संशय करु नका. जर तुमचे पतन झाले असेल, तरी तुम्हाला परत घेण्यात येईल, आजच्या सकाळी. जर तुम्हाला पवित्र आत्मा हवा आहे, तर येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या तुमच्या पापमोचनासाठी. कारण ते देवाचे अभिवचन आहे. तो ते अभिवचन कधी बदलणार नाही कोणत्याही मंडळीसाठी, संप्रदायासाठी, किंवा कोणाही साठी. ते त्याप्रकारेच असले पाहिजे. आम्हाला त्याच्या अटी पूर्ण केल्या पाहिजेत, मंडळीच्या अटी नव्हे, तर देवाच्या अटी पूर्ण केल्या पाहिजेत. तेच आम्ही केले पाहीजे.

140 तो म्हणाला, "विश्वासाची प्रार्थना आजाऱ्यांना बरे करिते." जर तुम्ही आजारी आहात, मी तुमच्यासाठी विश्वासाची प्रार्थना केली आहे. तुम्हीही आपल्या हृदयात प्रार्थना केली आहे. व विश्वास करुन स्विकारली आहे, त्यावर खंबीर उभे राहा. कारण हे असेच होणे गरजेचे आहे. जरी ते खिन्न वाटत असेल, तरी त्यात काही बदल होणे शक्य नाही.

141 तुम्ही म्हणता, "हो, मी अजून आजारी आहे असेच वाटत आहे;" परंतु ते तसे नाही…, हे जणू दूताचे पंख एकत्र येण्यासारखे. बस्स. देव आशीर्वादाच्या स्वरुपात असतो. ते जरी खिन्न वाटत असेल. थोडेसे अधिक जवळ या व त्याकडे परत नजर लावा, तुम्ही पाहाल देव स्वतः उभा आहे, व तो आपले वचन पाळीत आहे.

142 आता, आपल्या माना झुकलेल्या असताना, मी सभेचा पुढील भाग भाऊ, व पाळक नेविल यांच्याकडे सुपुर्त करतो.

***परमेश्वराविषयी निश्चिंत असणे*** MAR59-0125

(Be Certain Of God)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवारी सकाळी, 25 जानेवारी, 1959 साली, ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफरसनविल येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे

MARATHI

©2018 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## <u>छपाईच्या हक्काची सूचना</u>

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS
P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A
www.branham.org.